निशाण क्र. ५० वरील आदेश

वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, दावा मिळकतीपैकी कलम १३अ मध्ये नमूद केलेल्या दावा मिळकतीबाबत दि. ११/०९/२०१५ रोजी नोंदवलेले हक्कसोडपत्र दस्त क्र. १२४४/२०१५ बाबत दाव्यात नमूद करून देखील त्याबाबत केवळ वाटपाची दाद मागितली आहे व नजरचुकीने हक्कज्ञापन मागण्याचे राहून गेले आहे. दावा मिळकतीबाबत झालेले दस्त क्र. १२४४/२०१५ व १२४५/२०१५ हे दोन्ही दस्त बेकायदेशीर असून वादी अगर प्रतिवादी यांना कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत. तथापि कोणतीही तांत्रिक बाधा राहू नये म्हणून दस्त क्र. १२४४/२०१५ हा चुकीचा बेकायदेशीर तसेच वादीवर बंधनकारक नसल्याचा व रद्दबातल असल्याचे हक्क ज्ञापन मागण्यासाठी वादी हे दावा कलम ४ मधील उपपरिच्छेद क्र. १ वरील मिळकतीचा हक्कसोडपत्र अशी सुरूवात असलेल्या परिच्छेदानंतर जादा मजकूर लिहण्यास तसेच दावा कलम ११ मधील पुढे रोज घडत आहे यानंतर जादा मजकूर तसेच दावा कलम १२, १३ मध्ये जादा मजकूर लिहण्यास परवानगी मागत आहेत. सदरच्या दुरूस्तीमुळे दाव्यात काहीही फरक होणार नाही अथवा स्वरूप बदलणार नाही. या कारणास्तव अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादीतर्फे नि. क्र. ५० वर सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. वादी याने अर्जात मागितलेली दुरूस्ती व दावा या दोन्हीमधील कथन एकमेकांच्या विरूध्द आहे. एका बाजूला वादी आपल्या दाव्यातील परिच्छेद क्र. ४ येथे हक्कसोडपत्र

दस्त क्र. १२४४/२०१५ अन्वये प्रतिवादी क्र. २ यांनी वादीच्या लाभात आपला हक्क सोडला आहे असे म्हणतो आहे. तर दुसरीकडे प्रतिवादी क्र. २ यांनी जोर जबरदस्तीने वादीकडून हक्कसोडपत्र दस्त क्र. १२४५/२०१५ चा दस्त लिहून घेतला असे कथन करतो. वादी हे हक्कसोडपत्र दस्त क्र. १२४४/२०१५ अन्वये हक्कसोडपत्रात नमूद मिळकती सह मालकीच्या असल्याबाबतचा ठराव करून मागून त्यामध्ये निम्मा हिस्सा मागत आहे. त्याचबरोबर दस्त क्र. १२४५/२०१५ रद्द करून मागत आहेत. सदरच्या दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादींना आपल्या कथनांमध्ये दुरूस्ती करता येते. सदरची दुरूस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात येण्याकरीता आवश्यक असावी. वादींनी प्रस्तूतचा दावा हक्कज्ञापनाकरीता वाटपाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांच्यातील कथन पाहता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी एकमेकांच्या नावे दावा मिळकतीबाबत हक्कसोडपत्र अनुक्रमे १२४४/२०१५ व १२४५/२०१५ करून दिले आहे. वादीने दाव्याच्या कामी त्यांनी प्रतिवादी क्र. २ च्या नावे करून दिलेले हक्कसोडपत्र १२४५/२०१५ बाबत हक्कज्ञापन मागितले आहे. परंतू प्रतिवादी क्र. २ ने वादीच्या नावे करून दिलेले हक्कसोडपत्र क्र. १२४४/२०१५ बाबत दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. वादीच्या कथनानुसार सदरचे हक्कसोडपत्र देखील बेकायदेशीर व चुकीचे आहे. त्याकरीता दाव्यात दुरूस्ती होणे गरजेचे आहे. या ठिकाणी प्रतिवादी क्र. १, ३, ४ व ५ यांनी दिलेली

कैफियत पाहता त्यांनी देखील कैफियत परिच्छेद क्र. ९ मध्ये वादी याने प्रतिवादी क्र. २ यांना लिहून दिलेले हक्कसोडपत्र तसेच प्रतिवादी क्र. २ यांनी वादी यांना लिहून दिलेले हक्कसोडपत्र दोन्ही दस्तऐवज खोटे असून त्या अन्वये वादी व प्रतिवादी क्र. २ यांना कोणतेही हक्क मिळण्याजोगे नाही असे नमूद केले आहे. प्रस्तूत दावा वादीनी प्रतिवादींविरूध्द वाटपाकरीता व हक्कज्ञापनाकरीता दाखल करून दाव्यामध्ये समान हिस्सा मागितला आहे. दाव्याचे स्वरूपा पाहता वादी मागत असलेली दुरूस्तीची दाद देणे योग्य व अंतिम निर्णयाकरीता उचित राहिल. प्रस्तूत दावा अद्याप चौकशीस लागलेला नाही. अशा परिस्थितीत वादी मागत असलेली दुरूस्तीची दाद देता येईल. त्यामुळे सदर दुरूस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आजपासून १४ दिवसांचे आत नियोजित दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: ०१/१०/२०१९

(बी. आर. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.10.02 11:20:07 +0530